(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचे मराठी भाषांतर)

१९६१ - २ - ४९३

आयकर आयुक्त, बॉम्बे (मुंबई) शहर , बॉम्बे

वि.

बिपिनचंद्र मगनलाल आणि कंपनी लि., बॉम्बे

एस. के. दास, एम. हिदायतुल्लाह आणि जे. सी. शाह, न्या. न्या.

आयकर-नफा आणि मूल्यांकन करण्यायोग्य उत्पन्न- मधला फरक - नफ्याचा तुटपुंजापणा - कसा ठरवला- भारतीय आयकर कायदा १९२२ (१९२२ चा २), एस एस १० (२) (VII) दुसरी तरतूद, ६६(१).

प्रतिवादी कंपनीने ठराविक मशिनरी रु. ८९,०००/- ला खरेदी केली आणि त्याच किमतीला ती विकली , परंतु लेखा - पुस्तकात यंत्राचे, घसारा झाल्यावरून कमी करून दाखवलेले मूल्य हे ७३,३९२/- नोंदवलेले होते. आयकर अधिकाऱ्याने कंपनीच्या मूल्यांकनयोग्य उत्पन्नाची गणना करताना वास्तविक मूल्य आणि दरम्यान कंपनीच्या नफ्याचे लिखित मूल्य यामधील पडणारा फरक म्हणजे रु. १५,६०८/- हा कंपनीच्या फायद्यामध्ये समायोजित करून अधिक केला. आयकर अधिकाऱ्याने आयकर कायद्याच्या कलम २३ अ अन्वये एक आदेश पारित केला आणि असे निर्देश दिले की मूल्यमापन योग्य उत्पन्नाचा अवितरित भाग लाभांश

म्हणून भागधारकांमध्ये वितरित केला गेला असे मानले जाईल. आयकर अधिकाऱ्याच्या आदेशाविरोधातील अपील अयशस्वी ठरले आणि अपीलीय न्यायाधिकरणाने खालील प्रश्न उच्च न्यायालयाला निर्देशित केला. ६६(१) :-

करदात्या कंपनीने जाहीर केलेल्या लाभांशापेक्षा मोठा लाभांश देणे अवाजवी ठरेल का, हे ठरविण्याच्या हेतूने करदात्या कंपनीच्या नफ्यात १५,६०८ रुपयांची रक्कम समाविष्ट करायला हवी होती का?

विशेष परवानगीच्या याचिकेवर उच्च न्यायालयाने नकारार्थी उत्तर देताना उच्च न्यायालयाने घेतलेले मत योग्य असल्याचे मत नोंदवले.

कलम १०(२)(७) या तरतुदीतील कल्पिल्याप्रमाणे, ते एस. २(६ सी) या परंतुकासह वाचले असता, करपात्र उत्पन्नाची गणना करताना कोणते उत्पन्न खरोखरच उत्पन्न नाही: परंतु त्या प्राप्त परीस्थितीत तो व्यावसायिक नफाच नाही आणि जर तो व्यावसायिक नफा नसेल तर तो कमी आहे हे लक्षात घेता त्याचे मूल्यमापन करताना नफ्याचा जास्तीच्या रकमेचा लाभांश अवाजवी ठरेल हे विचारात घेतले जाणार नाही.

"नफ्याची न्यूनता (नफ्याची कमी दाखवलेली रक्कम)" याची तुलना मूल्यमापनाची रक्कम कमी असणे याच्याशी करता कामा नये" परंतु ते व्यावसायिक तत्त्वांच्यानुसार निश्चित केले पाहिजे. सर कस्तुरचंद लि. वि. आयकर आयुक्त, मुंबई शहर, (१९४९) XVII आय. टी. आर. ४९३, एज्रा प्रोप्रायटरी इस्टेट लि. वि. आयकर आयुक्त, पश्चिम बंगाल, (१९५०) XVIII आय.

टी. आर. ७६२ आणि आयकर आयुक्त मुंबई शहर वि. एफ. एल. स्मिथ अँड कंपनी (बॉम्बे) लिमिटेड, (१९५९) एक्स एक्स व्ही आय.टी.आर. १८३

दिवाणी अपील अधिकार क्षेत्र

दिवाणी अपील क्रमांक ७६१ / १९५७

सदरचे अपील हे मुंबई उच्च न्यायालय यांनी तत्कालीन आय. टी . आर. ४८ / एक्स / १९५४ मध्ये दिनांक २४ फेब्रुवारी, १९५५ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेश यावरून विशेष अनुमतीद्वारे पारित करण्यात आलेले आहे.

अपिलार्थीसाठी हरदयाल हार्डी आणि डी. गुप्ता.

उत्तरवादी साठी एन. ए. पालखीवाला आणि आय. एन. श्रॉफ.

१७ नोव्हेंबर, १९६० रोजी न्यायालयाचा निकाल खालीलप्रमाणे देण्यात आला .

शाह, न्या. - आयकर अपील न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ "अ", भारतीय आयकर अधिनियम, १९२२ च्या कलम ६६ (१) अन्वये संदर्भित - पुढे अधिनियम म्हणून संबोधले जाते - खालील प्रश्न:

“करदात्या कंपनीने जाहीर केलेल्या लाभांशापेक्षा मोठा लाभांश देणे अवाजवी ठरेल का, हे

ठरविण्याच्या हेतूने करदात्या कंपनीच्या नफ्यात १५,६०८ रुपयांची रक्कम समाविष्ट केली गेली असती का?"

उच्च न्यायालयाने या प्रश्नाचे नकारार्थी उत्तर दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुद्ध राज्यघटनेच्या कलम १३६ अन्वये विशेष अनुमती घेऊन हे अपील केलेले आहे.

मेसर्स बिपीनचंद्र मगनलाल अँड कंपनी, लिमिटेड - ज्याला यापुढे कंपनी म्हणून संबोधले आहे - जी भारतीय कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत आहे. कंपनी संदर्भात अशी गोष्ट आहे कि ज्यामध्ये कायद्याच्या कलम २३ ए मधील स्पष्टीकरणाच्या अर्थामध्ये जनतेला फारसा रस नसतो. संदर्भित वेळी तिचे चुकते भांडवल खालीलप्रमाणे २०,८०० रुपये होते.

प्रत्येकी ५० रुपयांचे २० शेअर्स पूर्ण चुकते आणि प्रत्येकी ५० रुपयांचे १९८० शेअर्स, प्रति शेअर १० रुपये चुकते केलेल्या स्थितीमध्ये.

डिसेंबर १९४५ मध्ये कंपनीने काही यंत्रसामग्री ८९,०००/- रु.ला खरेदी केली आणि ती ज्या किंमतीला मूळत: खरेदी केले होती त्याच किमतीला साधारणपणे मार्च १९४७ मध्ये विकली. कंपनीच्या हिशोबाच्या पुस्तकांमध्ये, १९४६-४७ (१ एप्रिल १९४६ ते ३१ मार्च १९४७) च्या खात्यातील यंत्रसामग्रीचे घसाऱ्या नंतरचे घेतलेले मूल्य ७३,३९२ रुपये होते. सन १९४६ - ४७ साठी कंपनीच्या लेखापुस्तकांद्वारे उघड झालेला कंपनीचा व्यापारिक नफा रु. ३३,२४५ होता. २१ ऑक्टोबर १९४७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत कंपनीने वित्तीय वर्ष्यासाठीचा लाभांश रु.

१२,०००/- जाहीर केला होता. कर निर्धारण १९४७-४८ या वर्षासाठी कर निर्धारण करताना आयकर अधिकाऱ्याने कंपनीने परत केलेल्या ३३,२४५ रुपयांच्या नफ्यात परत जोडून कंपनीचे १९४६-४७ या वर्षाचे करनिर्धारणयोग्य उत्पन्न ४८,७६१ रुपये इतके मोजले, कारण त्यामध्ये मार्च १९४७ मध्ये विकल्या गेलेल्या यंत्रसामग्रीच्या लेखी मूल्यापेक्षा १५,६०८ रुपये हि घसाऱ्यानंतरची कमी दाखवलेली रक्कम, नमूद होती. आयकर अधिकाऱ्याने कायद्याच्या कलम २३ अ अन्वये असा आदेश पारित केला कि १५,४२९ रुपये (देय करांद्वारे कमी झालेल्या कंपनीच्या मूल्यमापन योग्य उत्पन्नाचा अवितरित भाग असल्याने) सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत भागधारकांमध्ये लाभांश म्हणून वितरित केल्याचे मानले जाईल आणि प्रत्येक भागधारकाचा आनुपातिक वाटा त्याच्या एकूण उत्पन्नात समाविष्ट केला जाईल. त्यांच्या आदेशाविरोधात अपीलीय सहाय्यक आयुक्त आणि आयकर अपील लवादाकडे केलेले अपील अयशस्वी ठरले, परंतु कंपनीच्या म्हणण्यानुसार अपिलीय लवादाने कायद्याच्या कलम ६६ (१) अन्वये येथे नमूद केलेला प्रश्न मुंबई येथील उच्च न्यायालयाकडे निर्देशित केला.

या कायद्याचे कलम २३ अ (१) हे संबंधित वेळी (जेवढे लागू आहे तेवढे) खालीलप्रमाणे होते.

"कोणत्याही कंपनीने मागील वर्षाचा हिशेब सर्वसाधारण सभेत कंपनीसमोर ठेवल्यानंतर सहाव्या महिन्याच्या अखेरपर्यंत लाभांश म्हणून वितरित केलेला नफा त्या मागील वर्षाच्या कंपनीच्या मूल्यमापन योग्य उत्पन्नाच्या ६०% पेक्षा कमी आहे, असे आयकर

अधिकाऱ्याचे समाधान झाले असेल तर त्यासंदर्भात कंपनीने देय असलेल्या आयकर आणि सुपर टॅक्सच्या रकमेत कपात केल्यानुसार, आधीच्या वर्षांत कंपनीला झालेल्या तोट्याचा विचार करता किंवा केलेल्या नफ्याच्या कमी रकमेचा विचार करता, जाहीर केलेल्या लाभांशापेक्षा जास्त लाभांश देणे अवाजवी ठरेल, असे समाधान झाल्याशिवाय, निरीक्षक सहाय्यक आयुक्तांच्या पूर्वसंमतीने त्या मागील वर्षाच्या कंपनीच्या मूल्यमापन योग्य उत्पन्नाचा अवितरित भाग आयकराच्या उद्देशाने मोजला जातो असे लेखी आदेश देईल. आणि त्यासंदर्भात कंपनीने देय असलेल्या आयकर व अतिकराच्या रकमेत कपात केल्यास वरील सर्वसाधारण सभेच्या तारखेपर्यंत भागधारकधारकांमध्ये लाभांश म्हणून वितरित केल्याचे समजले जाईल..............

स्पष्टपणे, कलम २३ अ नुसार, आयकर अधिकाऱ्याला आदेश देणे आवश्यक आहे की कोणत्याही कंपनीच्या मूल्यमापन योग्य उत्पन्नाचा अवितरित भाग (ज्यात जनतेला फारसा रस नसतो) भागधारकांमध्ये लाभांश म्हणून वितरित केला गेला आहे असे मानले जाईल जर त्याला समाधान असेल की (१) कंपनीने आयकर आणि देय अति-कराद्वारे कमी केलेल्या मागील वर्षाच्या मूल्यांकन योग्य उत्पन्नाच्या ६०% भाग वितरित केले नाही, (२) जोपर्यंत (अ) कंपनीला आधीच्या वर्षांत झालेला तोटा किंवा (ब) मागील वर्षी झालेल्या नफ्यातील न्यूनता लक्षात घेता लाभांश किंवा जाहीर केलेल्या लाभांशापेक्षा मोठा लाभांश देणे अवाजवी ठरणार नाही. आर्थिक वर्षासाठी कंपनीचे एकूण मूल्यमापन योग्य उत्पन्न ४८,७६१ रुपये होते आणि त्यावर देय कर २१,३३२ रुपये होता: २७,२४९ रुपयांच्या ६०% (आयकर आणि सुपर-टॅक्स देय रकमेने कमी केलेले

मूल्यांकनयोग्य उत्पन्न) ४,४५८ रुपये जाहीर केलेल्या लाभांशापेक्षा जास्त होते. त्यामुळे कलम २३ अ अन्वये आयकर अधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्याची पहिली अट निर्विवादपणे पूर्ण करण्यात आली. पण नफ्याच्या न्यूनतेचा विचार करता (आधीच्या वर्षांत कंपनीला तोटा झाल्याचा कोणताही पुरावा या प्रकरणात नाही), प्रत्यक्षात जाहीर केलेल्या लाभांशापेक्षा मोठा लाभांश वितरित करणे अवाजवी ठरेल का, याचे समाधान आयकर अधिकाऱ्याला अजूनही करावे लागेल. आयकर अधिकाऱ्याने या प्रश्नाचा स्पष्टपणे विचार केला नाही: कलम २३ अ अन्वये आदेश देताना विक्रीतून मिळणाऱ्या यंत्रसामग्रीची किंमत आणि खात्याच्या वर्षातील लेखी मूल्य यातील फरक विचारात घेता येणार नाही, असा कंपनीने मांडलेला युक्तिवाद फेटाळून लावल्याने त्यांनी आपला निर्णय कायम ठेवला. हा फरक लक्षात घेतला तर मोठ्या लाभांशाचे वाटप अवाजवी नाही, असे त्यांनी गृहीत धरले आणि न्यायाधिकरणाने हे गृहीतक योग्य रितीने मांडले, या पायावर वाटचाल केल्याचे दिसते.

महसूल खात्यातर्फे असलेल्या वकिलांनी या आवाहनाच्या समर्थनार्थ युक्तिवाद केला आहे की, "नफ्याची न्यूनता" या शब्दाचा अर्थ मूल्यमापन योग्य उत्पन्नाच्या न्यूनतेपक्षा जास्त नाही आणि कोणत्याही परिस्थितीत, नफ्याच्या मोजणीत, खात्याच्या वर्षभरात त्याच्या लेखी मूल्यापेक्षा जास्त मशिनरी विकून वसूल केलेली रक्कम "नफ्याच्या न्यूनतेशी " संबंधित अट पूर्ण झाली आहे की नाही याचा विचार करण्यासाठी समाविष्ट करणे आवश्यक आहे.

सारभूत वेळेस कायद्याच्या कलम २ (६ क) मध्ये "उत्पन्न" याची व्याख्या म्हणजे नफा

समजली जाणारी कोणतीही रक्कम आणि या रकमेमध्ये, कलम १० उपकलम (२) खंड क्रमांक (७) मधील दुसऱ्या परंतुकाप्रमाणे नफा समजल्या जाणाऱ्या कोणत्याही रकमेचा समावेश आहे. कलम १० नुसार करदात्याने केलेल्या " व्यवसाय किंवा व्यवसायाचा नफा व लाभ " या शीर्षकाखाली त्याच्या नफ्याच्या किंवा नफ्याच्या मोजणीत, कोणत्याही इमारतीचे, यंत्रसामग्रीचे किंवा कारखान्याचे घसाऱ्यानंतरचे मूल्य व ती किती रकमेला विकली आहे, काढून टाकली आहे, जमीनदोस्त केली आहे किंवा मोडकळीस आलेली इमारत, मशिनरी किंवा प्लांट प्रत्यक्षात विकल्या गेलेल्या रकमेपेक्षा जास्त आहे किंवा त्याचे भंगार मूल्य मग वजावट म्हणून मंजूर केले जाते. परंतु हि मुभा मात्र कायद्याच्या कलम १० उपकलम (२) च्या खंड (७) च्या दुसऱ्या परंतुकामधील तरतुदीने विहित केलेल्या अपवादाच्या अधीन आहे. ज्या रकमेसाठी कोणतीही इमारत, यंत्रसामुग्री किंवा जमिनीच्या तुकड्याची विक्री केली जाते ती रक्कम घसाऱ्या नंतरच्या कमी झालेल्या मूल्यापेक्षा जास्त असेल तर मूळ किंमत व घसाऱ्या नंतर असलेले मूल्य यातील फरकापेक्षा जास्त रक्कम विक्री झालेल्या मागील वर्षाचा नफा समजली जाईल. कायद्याच्या कलम १० अन्वये कंपनीच्या नफा आणि लाभाची गणना करताना करपात्र उत्पन्नाचे मूल्यमापन करण्याच्या हेतूने यंत्राचे आर्थिक वर्षातील लेखी मूल्य व ती ज्या किमतीला विकली गेली (मूळ किमतीपेक्षा जास्त किंमत नसणे) यातील फरक हिशेबाच्या वर्षातील नफा समजला जायचा, आणि असा नफा असल्याने तो मूल्यांकनाच्या वर्षात मूल्यमापन योग्य उत्पन्नात समाविष्ट करणे आवश्यक होते. पण या कायद्याने मांडलेल्या काल्पनिकतेचा हा परिणाम आहे. खरे तर भांडवली

परतावा म्हणजे काय, हे कायद्याच्या हेतूने उत्पन्न म्हणून गणल्या जाणाऱ्या कल्पकतेवर आहे. कारण प्राप्त झालेली किंमत आणि घसाऱ्या नंतरची कमी झालेली किंमत यातील हा फरक हा आयकरात आकारण्यायोग्य आहे. त्याचे स्वरूप बदलले जात नाही आणि करदात्याच्या व्यावसायिक नफ्यात त्याचे रूपांतर केले जात नाही. तो करदात्याचा नफा आहे असे नाही: त्याने गुंतवलेल्या भांडवलाचा एक भाग म्हणून तो त्याला मिळतो, कलम १०(२) च्या खंड (७) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये असे असले तरी ही कल्पकता सादर करण्यामागचे कारण असे दिसते कि मागील वर्षांमध्ये, अवमूल्यनाची मुभा त्या वर्षांसाठी करपात्र उत्पन्न कमी करते आणि शेवटी मालमत्तेला लेखी मूल्यापेक्षा जास्त रक्कम विक्रीवर मिळते, म्हणजेच मूळ किंमत कमी अवमूल्यन भत्ता, महसुलाने नुकसान भरपाईसाठी जी परवानगी दिली होती ती परत घेणे योग्य आहे, कारण प्रत्यक्षात झीज झाली नाही. परंतु नियमाच्या कारणामुळे जमेचे खरे स्वरूप बदलत नाही. पुन्हा, हे बऱ्याच वर्षांपासूनचे संचित अवमूल्यन आहे आणि जे मालमत्ता विकल्या गेलेल्या वर्षाचे उत्पन्न मानले जाते. एखाद्या मालमत्तेचे कमी झालेले मूल्य आणि तीच्या विक्रीतून मिळणारी किंमत यातील फरक करदात्याच्या व्यवसाय करण्यातून मिळालेला नफा नसला तरी पूर्वीच्या वर्षांत परवानगी दिलेल्या वस्तू परत घेण्याच्या हेतूने मालमत्ता ज्या वर्षी विकली जाते त्या वर्षातील नफा म्हणून काल्पनिक स्तरावर गणला जातो.

एखादी कंपनी सामान्यत: त्याच्या व्यावसायिक नफ्यातून लाभांश वितरित करते आणि त्याच्या मूल्यांकन योग्य उत्पन्नातून नाही. मूल्यमापनयोग्य उत्पन्न आणि व्यावसायिक अर्थाने

व्यवसायाचा नफा यांच्यात कोणताही अतूट संबंध नाही. आयकराच्या मूल्यमापनाच्या उद्देशाने उत्पन्नाची गणना विविध कृत्रिम नियमांवर आधारित आहे आणि त्यात अनेक काल्पनिक जमा राशी वजावट आणि लाभ विचारात घेतले जातात. लाभांशाचे मोठे वितरण अवाजवी ठरेल का, याचा विचार करताना लाभांशाचे वितरण कोणत्या स्त्रोतातून करायचे आहे आणि मूल्यमापन योग्य उत्पन्न यामधून नाही, याचा विचार करावा लागतो. विधिमंडळाने कलम २३ अ मध्ये अशी तरतूद केलेली नाही की, अवितरित नफ्याचे वाटप, हे वाटप झाले आहे असे समजावे. असे आदेश देताना अश्या योग्य उत्पन्नाचा न्यूनतेचा मुद्दा विचारात घेतला जाईल.मोठा लाभांश वाटणे अवाजवी ठरेल का, याची चाचणी संबंधित वर्षाच्या नफ्याच्या अनुषंगाने ठरवावी लागेल. जरी एखाद्या कंपनीचे मूल्यमापन करण्यायोग्य उत्पन्न मोठे असले तरी व्यावसायिक नफा इतका कमी असू शकतो की देय करांमुळे कमी होणारे मूल्यमापन योग्य उत्पन्न आणि लाभांश म्हणून वितरित केलेली रक्कम यांच्यातील फरकाचे जादाचे वितरण केल्यास कंपनीला एकतर त्याच्या राखीव किंवा त्याच्या भांडवलावर हात घालावा लागेल जे कायद्याने ते करू शकत नाही. उदाहरणार्थ, मालमत्तेतून उत्पन्न मिळविणाऱ्या कंपन्यांच्या बाबतीत, मालमत्तेच्या वास्तविक वार्षिक मूल्यावर कायद्याच्या कलम ९ अन्वये कर आकारला जात असला, तरी प्रत्यक्ष प्राप्ती वार्षिक मूल्यापेक्षा बरीच कमी असू शकते आणि जर वाजवीपणाची कसोटी ही मूल्यांकन योग्य उत्पन्नाची मर्यादा असेल आणि व्यावसायिक नफा नाही, अशी प्रकरणे वारंवार उद्भवू शकतात ज्यात कंपन्यांना त्यांची उत्पन्न उत्पादक मालमत्ता विकावी लागू शकते. विधिमंडळाने

जाणीवपूर्वक "नफ्याची न्यूनता " हा शब्द वापरला आहे आणि "आकारणी योग्य नफ्याची न्यूनता " हे शब्द ज्या संदर्भात घडतात त्या संदर्भात असे काहीही नाही जे "नफा" आणि "मूल्यमापन करण्यायोग्य उत्पन्न" या अभिव्यक्तीचे समीकरण योग्य ठरवते. कलम २३ अ मधील नफ्याची न्यूनता प्रत्यक्ष किंवा काल्पनिक अशा एकूण मिळकतींच्या अनुषंगाने नव्हे, तर व्यावसायिक तत्त्वांच्या अनुषंगाने ठरवावी लागते.हे मत भारतातील उच्च न्यायालयांनी कोणत्याही असहमतीच्या मताशिवाय घेतलेले दिसते, पहा सर कस्तुरचंद लि. वि. आयकर आयुक्त, मुंबई शहर (१), एज्रा प्रोप्रायटरी इस्टेट लि. वि. आयकर आयुक्त, पश्चिम बंगाल (२) आणि आयकर आयुक्त, मुंबई शहर विरुद्ध एफ. एल. स्मिथ अँड कंपनी, (बॉम्बे) लि. (३)

काल्पनिकतेनुसार कलम १० (२) (७) मधील दुसऱ्या परंतुकातील तरतुदी या जर कलम २ (६ क) सोबत वाचल्या तर, ते मूल्यमापन करण्यायोग्य उत्पन्नाच्या मोजणीच्या हेतूने करपात्र उत्पन्न केले जाते जे प्रत्यक्षात उत्पन्न नसते : परंतु त्या कारणास्तव तो व्यावसायिक नफा ठरत नाही आणि जर तो व्यावसायिक नफा नसेल तर नफ्याची न्यूनता लक्षात घेता मोठा लाभांश अवाजवी ठरेल की नाही हे मूल्यमापन करताना विचारात घेतले जात नाही. आमच्या मते, उच्च न्यायाने हा मुद्दा अगदी बरोबरच ठरवला आहे, तो असा कि कंपनीने दाखवलेली नफ्याची न्यूनता विचारात घेता मोठा लाभांश जाहीर करणे अवाजवी ठरेल का, याचा विचार करताना १५,६०८ रुपयांची रक्कम विचारात घेणे योग्य ठरणार नाही, असे म्हणणे अगदी बरोबर आहे.

त्यामुळे अपील अयशस्वी ठरते आणि खर्चासह फेटाळण्यात आले आहे

अपील फेटाळले .

(१) (१९४९) XVII आय.टी.आर. ४९३.

(२) (१९५०) XVIII आय.टी.आर. ७६२.

(३) (१९५९) XXXV ITR १८३